

# बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी - मराठवाडा विभाग

## अनु. जाती, जमाती, ओबीसी, मुस्लिम आरक्षण समर्थनार्थ
## गायराण/सरकारी जमिनीवरील अतिक्रमण धारकांच्या
## हक्कासाठी व भुमिहीनांना जमिन मिळावी यासाठी
## बेरोजगारांच्या हक्कासाठी व सरकारी कर्मचारी नोकरभरतीसाठी



ॲड.डॉ. सुरेश माने

**दिनांक २३ ऑगस्ट २०२४ रोजी भडकल गेट औरंगाबाद**

# विराट मोर्चा

## नेतृत्व - ॲड. डॉ. सुरेश माने
### संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष बी.आर.एस.पी.

मित्रहो, बंधू-भगिनिंनो,

देश-राज्यातील अनेक सरकारांच्या चूकीच्या धोरणांमुळे, धनदांडगे उद्योगपती व परदेशी कंपन्या यांच्या हिताची सरकारी धोरणे राबविली यामुळे, विकासाच्या नावांखाली गोरगरीबांच्या जमिनी हिसकावून घेणे व कवडीमोल भावाने सरकारी भांडवलदारी मित्रांना देऊन शेतकरी कष्टक-यांना विस्थापित करने, तर सरकारी नोक-यांचे खाजगीकरण, कंत्राटीकरण, आऊटसोर्सींग करून मंत्र्या-संत्र्याच्याच दलाल कंपन्यांना अशी कंत्राटे देऊन सरकारी नोकरभरतीचा पायाच उध्वस्त करून राज्यातील सुशिक्षीत बेकारांना भिकेला लावणे असे केंद्र व राज्य सरकारांच्या अनेक धोरणाव्दारे केले जात असल्यामुळेच बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचा, मित्र संघटनांचा, गायराण धारक व भुमिहिनांचा आणि सुशिक्षीत बेकारांचा हा एलगार मार्च बीआरएसपीने **दिनांक २३ ऑगस्ट २०२४ रोजी औरंगाबाद** या ठिकाणी आयोजीत केलेला असुन या विराट मोर्चाचा प्रारंभ **औरंगाबाद** शहरातील **भडकल** गेट पासून **सकाळी ११ वाजता** सुरू होईल व हा मोर्चा मराठवाडा विभागीय आयुक्त कार्यालयावर घडकेल आणि त्याच ठिकाणी या विरोट मोर्चाचे जाहीर सभेत रूपांतर होईल.

वरील मोर्चाच्या अत्यंत महत्वपूर्ण तीन विषयाच्या बाबत महाराष्ट्र शासणाचे अनेक जी.आर. उपलब्ध आहेत. परंतू त्यांची अमंलबजावणी नाही. मग ती बाब गायराण धारकांच्या नियमनाची असो किंवा भुमिहिनांना जमीनवाटपाची असो. राज्य आणि देशातील सरकारे सुशिक्षीत बेकारांना देव, धर्म, हिंदुत्व, कावडयात्रा यांच्यात अडकऊन ठेवीत आहेत. परंतू सरकारला नोकरभरती करायची नाही आणि आता तर देश आणि राज्यातील प्रत्येक सरकार अनु. जाती-जमातीचे, ओबीसी, मुस्लिमांच्या आरक्षणाचे राजकारण करीत असून अनु. जाती-जमातीचे वर्गीकरण, ओबीसीचे वर्गीकरण, जात जनगणनेला विरोध, आदिवासींचे डिलिस्टींग, मुस्लिमांच्या आरक्षणाला विरोध या षडयंत्राव्दारे संविधानिक आरक्षणाची हत्याच करीत आहेत. म्हणूनच अशी संविधानविरोधी धोरणे राबविणा-या, प्रत्येक सरकारी शासन-प्रशासन

यंत्रणेविरूध्द तीव्र संघर्ष केलाच पाहीजे त्याशिवाय घटनात्मक अधिकार संरक्षित होणार नाहीत म्हणूनच हा विराट मोर्चा होय. या मोर्चातील प्रमुख मागण्या...

१. सरकारी जमिनीवरील गायराण धारक व इतर अतिक्रमणधारक यांच्या जमीनीचे कायदेशीर नियमन होऊन त्याचा सातबारा त्यांच्या नावे झालाच पाहीजे.
२. भुमिहीनांना जमिनवाटप झाले पाहीजे.
३. सुशिक्षीत बेकारांच्या न्यायहक्कासाठी सरकारी नोकरभरतीचे खाजगीकरण, कंत्राटीकरण बंद करून सरकारी नोकरभरती झालीच पाहीजे.
४. अनु. जाती-जमाती, ओबीसी, मुस्लिम व इतरांचे घटनात्मक व कायदेशीर आरक्षण, पदोन्नती धोरण याची अंमलबजावणी झालीच पाहीजे. शिवाय आरक्षणाच्या आडून अनु. जाती-जमातीत, ओबीसी, मराठे, आदिवासी-धनगर भांडणे लावणारी सरकारी धोरणे हाणून पाडलीच पाहीजे.
५. सरकारी नोक-या व आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी तळागळातील जाती - जमाती, ओबीसी व इतरांना सक्षम करण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण, आर्थिक सहाय्य व इतर सुविधाव्दारे सक्षमीकरण झालेच पाहिजे.

याप्रकारे वरील विषयासबंधीत सर्व सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, बेरोजगार, गायराणधारक भुमिहीनांच्या संघटना व पदाधिकारी यांना याव्दारे आवाहन करण्यात येते की या मोर्चाची भुमिका व अत्यंत महत्वपूर्ण विषय लक्षात घेऊन शोषितांच्या व्यापक जनहीतासाठी आपण तन-मन-धनाने सहकार्य करावे व प्रचंड संख्येने या मोर्चात सहभागी व्हावे.

**आपले विनित**

| अरविंद कांबळे<br>प्रदेश महासचिव<br>बी.आर.एस.पी. | विजय शिनगारे<br>अध्यक्ष<br>औरंगाबाद |
|---|---|

**सहभाग**

१. भूमि अधिकार मोर्चा महाराष्ट्र
२. मानवी हक्क अभियान
३. लोकमोर्चा महाराष्ट्र
४. गायरान अतिक्रमण संघर्ष समिती
६. भटके विमुक्त अधिकार आंदोलन
७. श्रमिक मानव अधिकारी आंदोलन
८. वंचित हक्क आंदोलन
९. बहुजन भिमसेना

**हर जोर जुल्म के टक्करमे - संघर्ष हमारा नारा है**

**गायरान धारकांचा एकच नारा - करा आमच्या नावे सात बारा**

---

**प्रकाशक :- नाव ................. मोबाईल नं..........**